Godavari Foundation's

# GODAVARI COLLEGE OF ENGINEERING, JALGAON

Affiliated to Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere
P-51, M-Sector, Addl M.I.D.C., Bhusawal Road, Jalgaon-425003(M.S.)
Contact: +91-257-2212999 / 2213500
https://www.gfgcoe.ac.in/

# Newsletter 2022-23














## 'Shallom_Sunshine' फ्रेशर पार्टी

- 21 December 2022

याच अनुषंगाने गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयामध्ये द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी **Shallom Sunshine** या फ्रेशर पार्टीचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाला गोदावरी फाउंडेशनच्या सदस्य **डॉ. वर्षा पाटील** मॅडम यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य **डॉ. विजयकुमार पाटील**, **प्रा. हेमंत इंगळे** (अधिष्ठाता), **प्रा.ईश्वर जाधव** ( रजिस्ट्रार), **डॉ. विजयकुमार वानखेडे** (ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर) **डॉ .नितीन भोळे** (प्रमुख,बेसिक सायन्सेस अँड ह्युमानिटी), **प्रा अतुल बऱ्हाटे** (विद्युत विभाग प्रमुख), **प्रा तुषार कोळी** (यंत्र विभाग प्रमुख), **प्रा निलेश वाणी** (संगणक विभाग प्रमुख) महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी वर्ग उपस्थित होता.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन व सरस्वती पूजन करून झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य **डॉ विजयकुमार पाटील** यांनी कार्यक्रमामध्ये मार्गदर्शन करताना सांगितले की विद्यार्थ्यांनी त्यांची गुणवैशिष्ट्ये सादर करावी, जेणेकरून तुमच्या व्यक्तीमत्वात प्रगल्भता येईल. त्याचप्रमाणे अशा प्रकारच्या कार्यक्रमाच्या माध्यमातून परस्पर संबंध व सर्वांगीण विकास वाढतो. तसेच या संपूर्ण दिवसभर चालणाऱ्या कार्यक्रमामध्ये सर्वांनी हिरीरीने सहभाग नोंदवून कार्यक्रमाचा आनंद घ्या असे आवाहन केले.

दिवसभराच्या कार्यक्रमाच्या नियोजनामध्ये विद्यार्थ्यांचे सुप्तगुण, आत्मविश्वास तसेच त्यांमध्ये आपुलकीची भावना निर्माण व्हावी या पद्धतीने वेगवेगळ्या Rounds चे आयोजन करण्यात आले होते. यात मुख्यत: पहील्या फेरी मध्ये विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी वेगवेगळ्या Bowl मधून चिठ्ठी काढून त्यात दिलेले Task पूर्ण करायचे होते . **Fish bowl** नावाच्या या फेरीत पहिल्या वर्षाच्या सर्व मुला- मुलींनी अतिशय आनंदाने सहभाग नोंदवला. तद्नंतर दुसऱ्या फेरीसाठी निवड झालेल्या विदयार्थ्यांना **Ramp walk** करून काही प्रश्नांची उत्तरे देऊन आपले शारीरीक तसेच बौध्दीक कौशल्य दाखवायचे होते.त्यानंतर अंतिम फेरी मध्ये निवडलेल्या विद्यार्थ्यांना त्यांना अवगत असलेली कला सादर करायची होती. **Face off** च्या या फेरीत विद्यार्थ्यांनी **Dance**, **singing**, **Mimicry** अश्या वेगवेगळ्या कला सादर केल्या.

आणि या व सर्व फेरीमधुन Mr. Fresher आणि Miss.Fresher यांची निवड करण्यात आली यात Mr. Fresher म्हणुन कुणाल_धनगर व Miss Fresher म्हणून वर्षा_कोकणे हे विजेते ठरले.




## National Energy Conservation Day

- 17 December 2022

On the occasion of **National Energy Conservation Day**, on 14th December 2022, **Institution Innovation Council** (IIC) of **GF**'S **GCOE Jalgaon**, organised a **Talk** on topic, "**Energy Conservation**". **Prof Atul Barhate** (Convenor IIC) delivered the talk. Students of Electrical Engineering and Mechanical Engineering attended the program..

## महापरिनिर्वाण दिन

-27 May 2023

महापरिनिर्वाण दिनानिमित्त भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन🙏

**गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालय** जळगाव, येथे **महापरिनिर्वाण** दिन साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य **डॉ. विजयकुमार पाटील** यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली व्यक्त केली. तसेच काही निवडक विद्यार्थ्यांनी महापरिनिर्वाण दिनानिमित्त आपली मनोगते व्यक्त केली. सदर कार्यक्रमास समस्त प्राध्यापक वृंद, विद्यार्थी, कर्मचारीवृंद, व सर्व विभागाचे विभाग प्रमुख, उपस्थित होते.



## Lokbhasha

- 1 December 2022

**Department of Electronics and Telecommunication Engineering**, **GF**'s **Godavari College of Engineering**, Jalgaon had organized an event "**Lokbhasha**", at 10 am at Dr.Homibhabha Seminar Hall GF'S GCOE. This event was organised for engineering and polytechnic students. There were two rounds in the event, in **Round I**, the students had to translate the words, sentence or dialogue in to their own language. In **Round II**, the students had to represent their own language in the form of a limited speech or by recording a song in their own language. The students participated very enthusiastically. Principal **Dr VijayKumar Patil**, appreciated all the participants and congratulated all the winners. **Prof R V Patil** and all the office bearers of **TESA**, taken efforts for the success of the program.




















## Flag day

- 25 November 2022

**GF**'s **Godavari College of Engineering**, Jalgaon celebrated "**Flag day**" on 25th November 2022 under the **Communal Harmony Campaign** Week. The event is held under **National Foundation** for Communal Harmony.

For this event **Dr Vijay Kumar Patil**, (Principal of Godavari College of Engineering) took initiative along with the staff and students of the college and they **donated amount** to help **destituted children** in violence.

## महिला कबड्डी संघाची विद्यापीठ संघ म्हणून निवडदिन

-12 November 2022

**गोदावरी अभियांत्रिकी महाविघालयातील**, **महिला कबड्डी संघाची**, **विद्यापीठ संघ म्हणून निवड**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या (BATU) अंतर्गत जळगाव विभाग आंतर **महाविद्यालयीन कबड्डी स्पर्धा** दिनांक १०/११/२०२२ रोज़ी **एकलव्य क्रीडा संकुल जळगाव** येथे उत्साहात संपन्न झाल्या. यात जळगाव,धुळे,नंदुरबार, नाशिक जिल्ह्यातील संघांनी आपला सहभाग नोदविला.

गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयाचा कबड्डी संघ अंतिम सामन्यात गुलाबराव फ़ार्मसी विरुद्ध उपविजयी ठरला. विभागीय कबड्डी स्पर्धा साठी गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे ५ खेळाडुं.....

**माधुरी निकम**, **ब्रामाणे संध्या**, **पाटील ख़ुशबू**, **पाटील कोनिक़ा**, **शेवगण गितांजलि** .यांची निवड **विद्यापीठ संघा** मध्ये करण्यात आली आहे.

गोदावरी फ़ाउंड़ेशनचे अध्यक्ष **डॉ उल्हास पाटील**, सचिव **डॉ वर्षा पाटील**, **डॉ केतकी पाटील**, **डॉ वैभव पाटील**, प्राचार्य **विजयकुमार पाटील** यांनी खेळाडुंचे यशाबद्दल अभिनंदन केले. क्रीड़ा संचालक **प्रा. आसिफ़ खान** यांचे खेळाडनां मोलाचे मार्गदर्शन लाभले.



## Birth_Anniversary_celebration

- **15 October 2022**

**Birth_Anniversary_celebration** of **Bharat Ratna**, **Ex President Dr A P J**. **Abdul Kalam** sir as **Wachan Prerna Diwas GFGCOE** campus.























# अभियंता दिन

- 16 September 2022

**गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये अभियंता दिन उत्साहात साजरा**

भारतरत्न **श्री मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या** यांचा 15 सप्टेंबर हा जन्मदिवस अभियंता दिन म्हणून साजरा केला जातो. याच अनुषंगाने गोदावरी फाउंडेशन संचलित गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयात 15 सप्टेंबर 2022 रोजी सर्व **स्टुडन्ट कौन्सिलच्या** माध्यमातून **अभियंता दिन** साजरा करण्यात आला. त्यादिनानिमित्त महाविद्यालयात **डिजिटल पोस्टर** तसेच **zigzag मेमरी** इव्हेंट्स स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे **श्री संजय कुमार** (जनरल मॅनेजर टेलिकॉम बिजनेस एरिया हेड बीएसएनएल, जळगाव) हे उपस्थित होते. तसेच **श्री चेतन जाधव** (सीनियर इंजिनिअर बीएसएनएल, जळगाव) महाविद्यालयाचे प्राचार्य **डॉ विजयकुमार**, **प्रा दीपक झांबरे** (कोऑर्डिनेटर पॉलीटेक्निक) **प्रा हेमंत इंगळे** (अधिष्ठाता), **डॉ विजयकुमार वानखेडे** (ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर) तसेच महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक वर्ग, विद्यार्थीवर्ग उपस्थित होते.

**कार्यक्रमाची सुरुवात** दीप प्रज्वलन व सरस्वती पूजन तसेच श्री. मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून झाली. त्यानंतर मान्यवरांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतर अभियंता दिनाच्या निमित्ताने प्रशांत पाटील व दिपाली खोडके या विद्यार्थ्यांनी आपली मते मांडली.

**कार्यक्रमाचे प्रास्ताविक** करताना महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी अभियंता दिनानिमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अभियंता दिनाचे महत्त्व समजावून सांगितले. तसेच उत्कृष्ट अभियंता होण्यासाठी जे गुण आत्मसात करायला पाहिजे त्यावर प्रकाश टाकला. त्याचप्रमाणे आदर्श अभियंता श्री मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या बद्दल माहिती सांगताना त्यांनी केलेले कार्य समर्पक शब्दात मांडले.

त्यानंतर कार्यक्रमाचे **प्रमुख पाहुणे** श्री संजय कुमार यांनी विद्यार्थ्यांना स्वतःचे ध्येय निश्चित करून त्याचे नियोजन व साध्यता यावर मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे त्यांनी त्यांच्या विद्यार्थी दशेत असताना त्यांचा अभियंता होण्याचा प्रवास अतिशय रंजक पद्धतीने विद्यार्थ्यांना सांगितला. त्याचप्रमाणे जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर शिस्तपालन अतिशय महत्त्वाचे असते. तसेच सरकारी, खाजगी नोकरीचे नियोजन, त्यासाठीची मेहनत, ध्येयनिश्चिती या सर्व गोष्टी समजावून सांगितल्या.

त्यानंतर **श्री चेतन जाधव** यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सर्व शाखा या तेवढ्याच महत्त्वाच्या असतात व त्या माध्यमातून देशाची जडणघडण होत असते. तसेच त्यांनी उत्कृष्ट नियोजनाबद्दल विद्यार्थ्यांचे कौतुक केले. विद्यार्थ्यांसाठी आयोजित स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदविला.

# सायकलवर_चालणारे_वाटर_प्युरिफायर

- 25 August 2022

**गोदावरी_अभियांत्रिकी_महाविद्यालय_जळगाव**, येथे यंत्र विभागामध्ये, अंतिम वर्षात शिकत असणारी विद्यार्थी, नामे **अभिनीत_भावसार**, **दीपक_शुक्ला**, **मिहीर चौधरी**, आणि **वर्षा पाटील** यांनी सायकलच्या पेडलचा वापर करून बनविले वाटर प्युरिफायर. सामान्यतः वाटर प्युरिफायर चालविण्यासाठी विद्युत ऊर्जेचा उपयोग केला जातो, परंतु काही दुर्गम भागांमध्ये, जिथे विद्युत पुरवठा पोहचू शकत नाही, अशा ठिकाणी, सदर यंत्र खूप उपयोगी पडू शकते.

सदर यंत्रामध्ये पेडल द्वारे मिळणाऱ्या मानवीय ऊर्जेचा उपयोग करून, त्याचे, विद्युत ऊर्जेत रुपांतर केले जाते व ती ऊर्जा बॅटरी मध्ये साठवली जाते. सदर संचित ऊर्जेचा गरजेनुसार वापर करून, त्यावर वॉटर पुरिफायर चालविले जाते. सदर वाटर प्युरिफायर ची क्षमता १ मिनिटाला २ ते ३ लिटर पाणी फिल्टर करण्याएवढी आहे. बॅटरी एक वेळ संपूर्ण चार्ज केल्यावर त्याद्वारे सदर फिल्टर, सतत ३ ते ४ तास काम करू शकते. सदर प्रकल्पाची आखणी आणि बांधणी करताना विद्यार्थ्यांना **प्रा किशोर महाजन** (मार्गदर्शक), तसेच विभाग प्रमुख **प्रा तुषार कोळी** यांचे मार्गदर्शन लाभले.



# अहो आश्चर्यम..! सायकलवर चालणारे 'वॉटर प्युरिफायर'

## गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयातील यंत्र विभागाच्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांची कामगिरी

सकाळ वृत्तसेवा

जळगाव, ता. २४ : येथील गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयातील यंत्र विभागाच्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांनी सायकलीवर चालणारे वॉटर प्युरिफायर बनविले आहे.

अभिनीत भावसार, दीपक शुक्ला, मिहीर चौधरी आणि वर्षा पाटील यांनी सायकलच्या पेडलचा वापर करून हे वॉटर प्युरिफायर बनविले आहे.

सामान्यतः वॉटर प्युरिफायर चालविण्यासाठी विजेचा उपयोग केला जातो. मात्र, काही दुर्गम भागांमध्ये, जिथे वीजपुरवठा पोचू शकत नाही, अशा ठिकाणी हे यंत्र खूप उपयोगी पडू शकते. या प्रकल्पाची आखणी आणि बांधणी करताना विद्यार्थ्यांना प्रा. किशोर महाजन (मार्गदर्शक), तसेच विभागप्रमुख प्रा. तुषार कोळी व प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

जळगाव : सायकलीवर चालणाऱ्या वॉटर प्युरिफायरच्या प्रकल्पासह गोदावरी अभियांत्रिकीतील विद्यार्थी.

### असे चालते यंत्र

या यंत्रामध्ये पेडलद्वारे मिळणाऱ्या मानवीय ऊर्जेचा उपयोग करून, त्याचे वीज ऊर्जेत रूपांतर केले जाते व ती ऊर्जा बॅटरीमध्ये साठवली जाते. ती संचित ऊर्जेचा गरजेनुसार वापर करून, त्यावर वॉटर प्युरिफायर चालविले जाते. या वॉटर प्युरिफायरची क्षमता एक मिनिटाला दोन ते तीन लिटर पाणी फिल्टर करण्याएवढी आहे. बॅटरी एक वेळ संपूर्ण चार्ज केल्यावर त्याद्वारे फिल्टर सतत तीन ते चार तास काम करू शकते. या यंत्रामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना शुद्ध पाणी मिळण्यास मदत होणार आहे. ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.



29 ऑगस्ट 2022 **जिल्हा_क्रीडा_पुरस्कार_सोहळा_2022**

राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त, गोदावरी फाउंडेशन संचलित, **गोदावरी_अभियांत्रिकी_महाविद्यालय** जळगाव, व **हॉकी असोसिएशन जळगाव**, यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 29 ऑगस्ट 2022 (सोमवार), रोजी **जिल्हा क्रीडा पुरस्कार सोहळा 2022** आयोजित करण्यात येत आहे.

**ठिकाण**:- गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालय

एमआयडीसी, भुसावळ रोड जळगाव




## 75th Independence_Day

15th Aug 2022

75th **Independence Day** Grand Celebration at **GF**'s **Godavari College of Engineering**, Jalgaon.

✨Freedom is something we need to fight for. Our ancestors have fought hard to earn this freedom. The only gift we can give to our nation on Independence Day is the ability to work hard and promise to be responsible citizens of the nation.✨

**Never let go of it and always carry it within our hearts.**





## माजी सैनिक सत्कार सोहळा

**10th Aug 2022**




**Godavari College of Engineering**, with the continuation of the series of programs under **Azadi ka Amrut Mahotsav**, Ex Hawaldar (Wireless operator) of 107.A.D. Regiment of Indian Army **Mr Ravindra #Tryambak #Bharambe** is felicitated by Academic Dean of college **Prof H T Ingale**. On this occasion Ex serviceman shared his experiences of duty life. He motivated all with his words to serve the nation by becoming the disciplined citizen of the country. The program was conducted under the esteem guidance of Principal **Dr Vijaykumar Patil**. On this occasion Registrar of college **Prof I S Jhadav**, Polytechnic co-ordinator **Prof Deepak Zambare**, T&P officer **Prof Vijaykumar#Wankhede**, Program co-ordinator **#Prof A D Vishwakarma**,all Head of







7th August 2022

## 2nd_Indian_Patent has been granted to the work performed at GF's Godavari College_of_Engineering



# गोदावरी अभियांत्रिकीच्या शिरपेचात मानाचा तुरा

## यंत्र विभागाला भारत सरकारचे दुसरे पेटंट बहाल

**जळगाव** – गोदावरी फाउंडेशन संचलित गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयात एम.टेक. थर्मल इंजिनिअरिंग अभ्यासक्रमातील विद्यार्थी अनिल पाटील यांना 'Combined shell and tube in tube heat exchanger (condenser) for domestic refrigerator' या विषयावर आधारित प्रकल्पाला भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाकडून पेटंट बहाल करण्यात आले आहे.यामुळे गोदावरी अभियांत्रिकीच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.


संशोधनामध्ये शेल इन ट्यूब कंडेन्सर व ट्यूब इन ट्यूब कंडेन्सर चा उपयोग केला आहे. घरगुती रेफ्रिजरेटर मशीनच्या मागे असलेले एअर कुल्ड कंडेन्सर हे कम्बाइन्ड शेल अँड ट्यूब इन ट्यूब कंडेन्सर ने बदलविण्यात आले आहे. या कुलिंग प्रोसेसच्या बदलामुळे रेफ्रिजरेटर मशीनची कार्यक्षमता वाढते. या प्रभावी बदलामुळेच भारत सरकारचे पेटंट या संशोधनाला बहाल करण्यात आले आहे.अनिल पाटील यांना मिळालेल्या या यशामुळे गोदावरीच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. त्यांच्या या यशाबद्दल महाविद्यालयात जल्लोष व्यक्त करण्यात येत असून, अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांचे महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक वर्ग यांनी अभिनंदन केले आहे.

पेटंट मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त करुन अनिल पाटील यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील याचबरोबर विभागप्रमुख प्रा. तुषार कोळी, डॉ. अतुल पाटील यासोबत माजी खा.डॉ. उल्हास पाटील, सचिव डॉ. वर्षा पाटील, सदस्या डॉ. केतकी पाटील, डॉ. वैभव पाटील यांनी सतत अमोल मार्गदर्शन व सहकार्य केल्याने हे शक्य झाले, अशी भावना व्यक्त केली.

सदरचे संशोधन हे यंत्र अभियांत्रिकी शाखेतील एक अत्यंत महत्त्वाचे योगदान म्हणून ओळखले जाणार आहे. गोदावरी अभियांत्रिकीच्या यंत्र विभागाचे हे दुसरे भारतीय पेटंट आहे. अनिल पाटील यांचे योगदान व संशोधन महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल असा विश्वास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयकुमार यांनी व्यक्त केला.

Another feather in the success cap of GF's GCOE Jalgaon

We are very Happy to share that, the **2nd Indian Patent** has been granted to the **work** performed at **GF**'s **Godavari College of Engineering** Jalgaon, by our **ME** (Thermal Engineering) student, **Mr Anil S Patil**, under the **guidance** of **Dr Atul A Patil**, at Department of Mechanical Engineering. Mr. Anil Patil added a combined shell in tube and tube in tube condenser by replacing a air cooled condenser in domestic refrigerator. With this design changes the performance of domestic refrigerator enhances drastically. We Heartily **congratulate** to the patentee Dr. Atul Patil & Mr. Anil Patil, for their achievement, and wish them all the best for their future endeavours. The patentee Mr Anil S Patil & Dr. Atul A Patil, have expressed their gratitude for, **Dr VijayKumar Patil** (Principal), **Prof P V Phalak** (Vice Principal), & **Prof Tushar A Koli** (HOD Mech. Engg.), for their continuous cooperation and support. We also Congratulate to, **Department of Mechanical Engineering**, GF's GCOE Jalgaon for being awarded 2 nd Indian Patent to their work.



INTELLECTUAL PROPERTY INDIA
PATENTS | DESIGNS | TRADE MARKS
GEOGRAPHICAL INDICATIONS

क्रमांक : 022119209
SL No :

भारत सरकार
GOVERNMENT OF INDIA
पेटेंट कार्यालय
THE PATENT OFFICE
पेटेंट प्रमाणपत्र
PATENT CERTIFICATE
(Rule 74 of The Patents Rules)

| | | |
|---|---|---|
| पेटेंट सं. / Patent No. | : | 402890 |
| आवेदन सं. / Application No. | : | 201621022986 |
| फाइल करने की तारीख / Date of Filing | : | 05/07/2016 |
| पेटेंटी / Patentee | : | 1.PATIL ANIL 2.PATIL ATUL |

प्रमाणित किया जाता है कि पेटेंटी को, उपरोक्त आवेदन में यथाप्रकटित COMBINED SHELL AND TUBE IN TUBE HEAT EXCHANGER (CONDENSER) FOR DOMESTIC REFRIGERATOR नामक आविष्कार के लिए, पेटेंट अधिनियम, 1970 के उपबंधों के अनुसार आज तारीख जुलाई 2016 के पांचवें दिन से बीस वर्ष की अवधि के लिए पेटेंट अनुदत्त किया गया है।

It is hereby certified that a patent has been granted to the patentee for an invention entitled COMBINED SHELL AND TUBE IN TUBE HEAT EXCHANGER (CONDENSER) FOR DOMESTIC REFRIGERATOR as disclosed in the above mentioned application for the term of 20 years from the 5th day of July 2016 in accordance with the provisions of the Patents Act,1970.

अनुदान की तारीख / Date of Grant : 03/08/2022

Controller of Patent

टिप्पणी - [illegible]

Note. - The fees for renewal of this patent, if it is to be maintained will fall / has fallen due on 5th day of July 2018 and on the same day in every year thereafter.

31st July 2022

## गोदावरी_अभियांत्रिकीच्या_विद्यार्थ्यांनी_बनविले IOT_वर_आधारित_वातावरणातील_घटकांच्या_नोंदी करणारे_उपकरण

# गोदावरी अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी बनविले इंटरनेट ऑफ थिंग्जवर आधारित वातावरणातील घटकांच्या नोंदीचे उपकरण

जळगाव - गोदावरी फाउंडेशन संचलित गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्युत विभागातील विद्यार्थ्यांचे प्रकल्प सत्र सुरू आहे . यात वेगवेगळ्या विषयावर प्रकल्प सादर करावे लागतात त्या अनुषंगाने अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांनी 'इंटरनेट ऑफ थिंग्स' (IOT) यावर आधारित प्रकल्प तयार केलेला आहे.



मोबाइल ॲपचा उपयोग करून हे यंत्र काम करते . या यंत्राचा उपयोग आपण शेती , औद्योगिक व घरगुती क्षेत्रामध्ये करू शकतो. या यंत्रामुळे वेळेची , ऊर्जेची व पाण्याची देखील बचत होते. हा प्रकल्प इंटरनेट ऑफ थिंग्स वर आधारित असून जगातील कुठल्याही ठिकाणावरून ऑपरेट करू शकतो. या उपकरणाचे मॉडेल तयार करण्यासाठी अंतिम वर्षाचे विद्यार्थी राहुल पाचपांडे, चेतन पाटील, परेश फेगडे व पराग चौधरी यांनी मेहनत घेतली.

उपकरणामध्ये मायक्रो कंट्रोलर या यंत्रासह लेव्हल स्विच, सॉइल मॉइस्चर सेंसर, ह्युमिडिटी व टेम्प्रेचर सेंसर यांचा उपयोग केलेला आहे. मायक्रो कंट्रोलच्या मदतीने मोबाईल प द्वारे यंत्र चालू करून पंप चालू आणि बंद करू शकतो.

या प्रकल्पासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ विजयकुमार तसेच विभाग प्रमुख प्रा.अतुल बऱ्हाटे व प्रकल्प समन्वयक प्रा. सचिन माहेश्री तसेच विद्युत विभागाचे संशोधन अधिष्ठाता प्रा. महेश एच. पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

गोदावरी फाउंडेशन संचलित गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्युत विभागातील विद्यार्थ्यांचे प्रकल्प सत्र सुरू आहे . यात वेगवेगळ्या विषयावर प्रकल्प सादर करावे लागतात त्या अनुषंगाने अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांनी 'इंटरनेट ऑफ थिंग्स' (IOT) यावर आधारित प्रकल्प तयार केलेला आहे .

**मोबाइल_ॲपचा** उपयोग करून हे यंत्र काम करते . या यंत्राचा उपयोग आपण शेती , औद्योगिक व घरगुती क्षेत्रामध्ये करू शकतो. या यंत्रामुळे वेळेची , ऊर्जेची व पाण्याची देखील बचत होते.

हा प्रकल्प इंटरनेट ऑफ थिंग्स वर आधारित असून जगातील कुठल्याही ठिकाणावरून ऑपरेट करू शकतो. या उपकरणाचे मॉडेल तयार करण्यासाठी अंतिम वर्षाचे विद्यार्थी **राहुल पाचपांडे**, **चेतन पाटील**, **परेश फेगडे** व **पराग चौधरी** यांनी मेहनत घेतली.

उपकरणामध्ये मायक्रो कंट्रोलर या यंत्रासह लेव्हल स्विच, सॉइल मॉइस्चर सेंसर, ह्युमिडिटी व टेम्प्रेचर सेंसर यांचा उपयोग केलेला आहे. मायक्रो कंट्रोलच्या मदतीने मोबाईल ॲप द्वारे यंत्र चालू करून पंप चालू आणि बंद करू शकतो.








## Farewell Party 2k23 Day

- 13 June 2023

The **Farewell** Party was organised by the Third Year Engineering students, for the Final year Engineering students.

Principal **Dr VijayKumar Patil** alongwith, **Dean Academics**, **Training and Placement Officer** and all the **Head of Departments** were present as **prominent guests** for the event.

The final year students cherished their campus memories and expressed gratitude for all, what they got, within 4 years of their stay in college. All the HOD's, Dean Academics, Training and Placement Officer and Principal Dr. VijayKumar Patil Sir guided the students about career planning and self development. The Farewell Party started at 6.00 pm and continued with full of Joy and entertainment up to 10.00 pm. **Hon Dr Ulhas Patil** Sir (President Godavari Foundation), **Dr Ketaki Tai Patil** (Member Godavari Foundation) & **Dr. Vaibhav Patil** (Renowned Cardiologist Godavari Foundation), conveyed their best wishes for bright future endeavours of all the passing out students.












## International Yoga Day celebration at GF'S Godavari_College_of Engineering Jalgaon.

- 21 June 2023

GF'S Godavari College of Engineering Jalgaon, celebrates **International Yoga Day**, on 21st June 2023 at 7.00 am.

**Trainer**:- Prof. M N Patil

**Venue**:- Mini Lawn at GF'S GCOE Jalgaon.

## Industrial Visit

-27 May 2023

Students from **Department of Electrical Engineering** of **GF**'S **Godavari College of Engineering** Jalgaon, visited **Jain Valley**, **Solar Park**, & **Food Park** as a Industrial Visit.






## World_Telecommunication_Day

- 17 May 2023

Today, on the occasion of **World_Telecommunication Day**, **Institution**'s **Innovation Council** (IIC) of **GF**'s **Godavari College of Engineering**, Jalgaon in association with **IQAC Cell**, organized a **#Guest_Lectur**, on topic - "**Evoluation of Telephone Industry**" at 11:00 AM through **#online_mode**. **Er Chetan Jadhav**, (Nodal Officer from BSNL Jalgaon), was the speaker for the program. Program Coordinator **Prof R V Patil**, opened the talk, by stating the importance of Word Telecommunication Day. **Dr_VijayKumar_Patil** (Principal GF'S GCOE), enlightened over the day to day changing technology and the evolution in the communication sector. The speaker of today's talk **Mr Chetan Jadhav**, elaborated on the challenges and opportunities in the upcoming technologies like 5G & 6G. The program was organised by Prof. R V Patil under the guidance of Dr. VijayKumar Patil and Prof. Hemant Ingale ( Dean Academics).

**Prof_Rajendra_V_Patil**

Co-ordinator

**Prof_Hemant_Ingale**

H.O.D. E&TC Engineering

Dean (Academics)

**Dr_Vijaykumar_Patil**

Principal & President,

Institution's Innovation Council (IIC), GF'S GCOE, Jalgaon








## FDP on Blooming Research Areas Under IoT A 360

- **07 May 2023**

**GF**'s **Godavari College of Engineering Jalgaon** (GFGCOEJ) (NAAC Accredited), in **Collaboration** with **IEEE Bombay section** Education activity committee, **St Francis Institute of Technology** (SFIT), Mumbai (NAAC, NBA accredited) & **M H Saboo Siddik College** of Engg. (MHSSCE), Mumbai (NBA Accredited) is Hosting **IEEE FDP** on "**Blooming Research Areas Under IoT A** 360-**Degree View**" Sponsored by IEEE Bombay Section (Online Capacity Building Workshop)
**Schedule**:-from 02 May, 2023 to 07 May, 2023.
Time: 10 am to 5 pm.
**Mode of Conduction**:- Online **Last Date of Registration**:- 01 May, 2023

**About this IEEE BS FDP**:-
From the consumer to the military, IoT encompasses a variety of commercial and industrial industries. Agriculture, spaceflight, healthcare, manufacturing, construction, water, and mining are among the sectors that are currently updating their legacy infrastructure to include IoT. A variety of IoT solutions are being developed as a result of the viability of ubiquitous connectivity, storage, and computation. IoT-based systems are increasingly being employed in emergency alerts, remote health monitoring, cutting-edge retail systems, infrastructure management in urban and rural areas, and transportation. Therefore, it is essential to comprehend the fundamentals of this novel technology.
**Registration Link**: **https://forms.gle/7XyMe4qhgtTKWSNT9**






पुण्य प्रताप मंगळवार दि.९ मे २०२३ २

**गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये ब्लूमिंग रिसर्च एरियाज अंडर आय. ओ. टी.३६० डिग्री विषयावर ऑनलाइन कपॅसिटी बिल्डिंग कार्यशाळा उत्साहात**

जळगाव - गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालय तसेच आयइइइ बॉम्बे सेक्शन एज्युकेशन ॲक्टिव्हिटी कमिटी व सेंट फ्रान्सिस इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी मुंबई आणि एम एच साबू सिद्दिक कॉलेज ऑफ इंजीनियरिंग, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने २ मे ते ७ मे दरम्यान आयोजित ब्लूमिंग रिसर्च एरियाज अंडर आय ओ टी ३६० डिग्री व्ह्यु या ऑनलाइन कपॅसिटी बिल्डिंग कार्यशाळा उत्साहात पार पडली.

दिनांक २ मे २०२३ रोजी श्री आनंद घारपुरे(अध्यक्ष खइइइ, बॉम्बे सेक्शन) यांच्या उपस्थितीत व मार्गदर्शनाने फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम चे उद्घाटन करण्यात आले.

कार्यक्रमांमध्ये प्रा. हेमंत इंगळे (समन्वयक IEEE BS FDP) यांनी प्रोग्रामचे उद्दिष्टे विषद केली.

त्यानंतर गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ . विजयकुमार पाटील यांनी या ऑनलाइन FDP मध्ये मार्गदर्शन केले. त्यात त्यांनी खजद या क्षेत्राबद्दल माहिती देताना त्याची उपयुक्तता विशद केली.

आईईईई इएसी च्या अध्यक्षा व प्रमुख पाहुण्या डॉ. जॉली लोचन यांनी आईईईई संशोधन समुहास संलग्न होण्याचे फायदे विषद केले.

त्यानंतर डॉ. कविता सोनवणे (SFIT) यांनी या कार्यक्रमाचे महत्व व मार्गदर्शन केले.

त्यानंतर या कार्यक्रमांमध्ये विविध १७ विषयांवर आधारित सेशन्स मध्ये विविध निष्णात तंत्र उद्योजक व प्राध्यापक मान्यवरांकडून मार्गदर्शन करण्यात आले. त्यात आय ओ टी इन स्मार्ट सिटीज अँड होम्स, वेब ऑफ एव्हरीथींग, सिक्युरिटी इश्युज, क्लाऊड तंत्रज्ञान, फॉरेंसिक, मशीन लर्निंग, आरडुइनो व रास्पबेरी पाय प्रोग्रामिंग, बीझनेस मॉडेल आणि ब्लॉकचेन आयओटी इ. समाविष्ट आहेत.

कार्यक्रमाच्या समारोपाअंती प्रश्नमंजुषा घेण्यात आली, त्यामध्ये देशभरातून १३० प्राध्यापक सहभागी झाले.सदर कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून प्रा. हेमंत इंगळे (GFGCOE, Jalgaon) डॉ. कविता सोनवणे (SFIT, Mumbai), डॉ जिलानी सय्यद (MHSSCE, Mumbai) काम पाहिले.

तसेच कार्यक्रमाचे कोऑर्डिनेटर्स म्हणून प्रा. व्हि. डी. चौधरी (GfGCOEJ), प्रा. निधी गौर (SFIT), प्रा.वर्षा श्रीवास्तव (SFIT), प्रा. वृषाली ठक्कर (MHSSCE) यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

गोदावरी फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. उल्हास पाटील सर तसेच सदस्य डॉ. केतकी पाटील मॅडम यांनी सदर कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल आयोजकांचे अभिनंदन केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. शिरीन पिंजारी यांनी केले.

## TECHNOVATION

-15 April 2023

The students of **Department of Electrical Engineering** from **GF**'S **GCOE** Jalgaon, wins the state level project competition, "**TECHNOVATION**", organised by **IEEE Bombay Section**.

✨The Students of Department of Electrical Engineering, from Godavari College of Engineering were awarded **second prize** and special IEEE "**Public Choice Award**" at IEEE TECHNOVATION 2023 held at **Sanjeevani College of Engineering**, Kopargaon, Ahmadnagar.

✨The TECHNOVATION 2023 was organized on 15th April 2023 at Sanjeevani College of Engineering and assessed by nearly 30 judges, including the IEEE BOMBAY section members, as well as experienced teachers, and eminent entrepreneurs. Around 28 teams from 7 divisions across Maharashtra were selected for this grand finale.

✨"**Smart Security Pole**" a project by GF'S GCOE students, received the second prize, as well the public choice award. The Smart Security Pole project, provides electric fencing for security as well as mobile charging, along with the features like, spray pump charging, protection from optical lightning, real time CCTV camera using energy source through solar panel.












## Students_Association_Installation

- 6 March 2023

Students Association Installation ceremony was organised at **GF**'s **Godavari College of Engineering** Jalgaon. Every year the students association are formed department wise, like **MESA** (Mechanical Engineering Students Association), **CESA** (Computer Engineering Students Association), **EESA** (Electrical Engineering Students Association) & **TESA** (Telecommunication Engineering Students Association) and the office bearers for this associations are selected among the students. These associations provide a great platform to students for showcasing their leadership and management skills. For today's installation program **Mr Vaibhav Kushare** ( journalist and head coordinator Sakal YIN for Khandesh region), was present as special guest, along with **Dr VijayKumar #Patil** (Principal GF'S GCOE), **Prof**. **#Hemant Ingale** ( Dean Academics), **Prof Dipak Zambare** ( Coordinator Polytechnic college), all the Head of Departments. All the newly appointed office bearers of all the associations, have been given a warm welcome and the official badges of their post presented to them. Afterward all the presidents of all associations, shared their views and agenda for the upcoming events.

The guest **Mr Vaibhav Kushare**, shared their student life experiences while elaborating the importance of students association and it's role in overall development of the student.










## महाविद्यालयात_शिवजयंती_निमित्त_शिवाजी महाराजांचा_जन्मोत्सव_जल्लोषात_साजरा

गोदावरी फाउंडेशन संचलित गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालय येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या 393 व्या, जयंतीनिमित्त दिनांक 19 फेब्रुवारी 2023 रोजी शिवजयंती चे आयोजन करण्यात आले होते.
याप्रसंगी गोदावरी फाउंडेशनच्या सदस्य **डॉ केतकी पाटील** ह्या प्रमूख अतिथी म्हणून, उपस्थित होत्या. तसेच सदर कार्यक्रमाला **श्री एस टी चौधरी** सर (जामनेर) हे प्रमुख वक्ता म्हणून उपस्थित होते. त्यांच्यासोबत महाविद्यालयाचे प्राचार्य **डॉ विजयकुमार पाटील**, **प्रा दीपक झांबरे** (कॉर्डिनेटर, पॉलीटेक्निक), **प्रा ईश्वर जाधव** (रजिस्ट्रार), सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक वर्ग तसेच विद्यार्थी अधिक संख्येने उपस्थित होते. महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी आणि विद्यार्थिनी यांनी पारंपारिक वेशभूषा परिधान केली होती. मिरवणुकीमध्ये मुलींच्या लेझीम पथकाने, अतिशय जल्लोषात वेगवेगळ्या प्रकारांचे लेझिम नृत्य सादर केले. ढोल ताशांच्या गजरात तल्लीन विद्यार्थी व विद्यार्थिनींनी अतिशय जल्लोषात **मिरवणूक** काढली होती.
कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांनी केलेल्या कार्याचा उल्लेख केला व त्याचप्रमाणे शिवाजी महाराज हे एक जाणता राजा होते, त्यांचे व्यक्तिमत्व हे अष्टपैलू होते. महाराजांच्या अंगी असलेले गुण विद्यार्थ्यांनी आत्मसात करायला हवे असे त्यांनी आवाहन केले.
त्यानंतर महाविद्यालयातील काही विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बद्दल त्यांचे **मनोगत** व्यक्त करताना शिवरायांच्या चरित्रावर चे पोवाडे तसेच वकृत्व सादर केले.
त्यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख वक्ता शिवव्याख्याते **श्री. एस टी चौधरी** सर यांनी शिवचरित्र सांगताना महाराजांच्या लहानपणापासूनच त्यांना स्वराज्याचे बाळकडू मिळाले होते. सध्या परिस्थितीत युवकांनी पुढाकार घेऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या अंगी असलेले गुण व नेतृत्व स्वतःमध्ये अंगीकारण्याची गरज आहे. तसेच त्यांनी अष्टप्रधान मंडळ व महाराजांचे व्यवस्थापन यावर उदाहरणासहित स्पष्टीकरण केले.

त्यानंतर गोदावरी फाउंडेशनच्या सदस्य **डॉ केतकी पाटील** यांनी शिवजयंती उत्कृष्टपणे साजरी केल्याबद्दल सर्व विद्यार्थी आणि विद्यार्थिनींचे कौतुक केले.

कार्यक्रमांमध्ये पोवाडा व वक्तृत्व सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीसांचे वाटप करण्यात आले.









## Alumni Meet 2023

-23 January 2023

An online Alumni Meet 2023, happened at GF'S GCOE Jalgaon, on 22 nd January 2023. Alumni Association of GF'S GCOE Jalgaon, organized the meet, under the presidency of Prof_Kishor_Mahajan. Alumni from every corner of the country witnessed the meet, by cherishing the memories of college days and sharing the experiences and success with each other. Every alumni expressed their eagerness to contribute in the development of college in all the way possible for them. Prof. K M Mahajan (President Alumni Association), open the meet by preamble speech. Dr.VijayKumar_Wankhede (Training and Placement Officer), expressed the importance of Meet, and shown gratitude to all the alumni for their affiliation with the college. Dr_VijayKumar_Patil (Principal GF'S GCOE Jalgaon), addressed the meet as a chief guest, and presented their view of the meet. How the college is making its way towards excellency, and how the alumni can contribute to it, very nicely elaborated by Dr. VijayKumar Patil, We are very much thankful to all the alumnis for attending the meet and showing their affiliation with the college, we wish them all the very best for their future endeavours.












## Alumni Meet 2023

-23 January 2023

It gives us immense pleasure to share with you that the **Institution**'s **Innovation Council** (IIC), of **GF**'s **Godavari College of Engineering**, Jalgaon, is organizing a session on " **Problem Solving and Ideations Workshop** " in association with **IQAC Cell** & **Alumini Association**.

Registration Link

**https://forms.gle/BkFWMKLQUQwFTRUa9**

**Schedule**:-Monday, 23rd January 2023. Time:11.00 AM

**Venue** :-

Dr. A.P.J. Abdul Kalam Hall, GF'S GCOE Jalgaon.

Resource Person:

**Mr_Vijay_V_Chaudhari**

Director, Bio-medical Engineering,

Dr.Ulhas Patil Medical College and Hospital, Jal. Kh.